# ९. सदैव सैनिका, पुढेच जायचे

● ऐका. वाचा. म्हणा.



सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे

सदा तुझ्यापुढे उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेच या विजा भयाण हासती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे


प्रलोभने तुला न लोभ दाविती
न मोहबंधने पदांस बांधिती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भासतो गजान्त वैभवी
न दैन्यही तुझे कधी सरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे



**वसंत बापट** (१९२२-२००२) : प्रसिद्‌ध कवी. 'अकरावी दिशा', 'सकीना', 'प्रवासाच्या कविता', 'शिंग फुंकिले रणी', 'मानसी', 'शूर मर्दाचा पोवाडा', 'मेघहृदय', 'तेजसी', 'राजसी', 'रसिया' हे काव्यसंग्रह; 'चंगामंगा', 'अबडकतबडक', 'आम्ही', 'बालगोविंद' हे बालवाङ्‌मय; 'बारा गावचं पाणी' हे प्रवासवर्णन प्रसिद्‌ध. 'शिंग फुंकिले रणी' या पुस्तकातून ही कविता घेतलेली आहे.

प्रस्तुत कविता ही देशाच्या रक्षणासाठी अहोरात्र झगडणाऱ्या सैनिकांच्या समर्पित जीवनाचा परिचय करून देणारी आहे.

**शब्दार्थ :** **सदैव** – नेहमी. **मागुती** – मागे. **निशा**– रात्र. **ग्रासणे**– व्यापणे. **प्रलोभन**– आमिष. **मोहबंधन**– मोहात पडणे. **गजान्त वैभव**– अतिशय श्रीमंती. **दैन्य**– गरिबी.



## स्वाध्याय

**प्र. १. खालील प्रश्नांची एक–दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सैनिक नेहमी मनाशी कोणते ध्येय बाळगतो?

(आ) सैनिकापुढे कोणती संकटे उभी आहेत?

(इ) सैनिकाला कोणत्या गोष्टी थांबवू शकत नाहीत?

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दांसाठी कवितेतील समानार्थी शब्द लिहा.**

(१) आकाश (२) रात्र (३) ढग (४) राग (५) लोभ

**(आ) गटात न बसणारा शब्द लिहा.**


(१) निशा, रजनी, यामिनी, मेघ (२) सदैव, नित्य, सदोदित, क्वचित

**(इ) अचूक शब्द ओळखा.**

(१) दीशा/दिशा/दीषा/दिषा

(२) सैदव/सदईव/सदैव/सदवै

**(ई) 'गैर' हा उपसर्ग लावून तयार झालेले शब्द खालील आकृतीत दिले आहेत. हे शब्द अभ्यासा. 'अ' हा उपसर्ग लावून तयार होणारे शब्द पुढील आकृतीमध्ये लिहा.**




### खेळ खेळूया.

- **पिवळ्या चौकोनात जोडशब्दातला पहिला शब्द व गुलाबी चौकोनात जोडशब्दातला दुसरा शब्द दिला आहे. त्यापासून योग्य जोडशब्द तयार करा. दिलेल्या जागेत लिहा.**

गुलाबी चौकोन: संध्याकाळ, कौतुक, खाली, फटक, घुबरा, टप्पा, जमव, दरी

पिवळा चौकोन: कोड, वर, पांढरे, सकाळ, डोंगर, जमवा, गप्पा, घाबरा

__________ __________

__________ __________

__________ __________

__________ __________



## लिहिते होऊया.

**(अ) तुम्ही कोण होणार, ते ठरवा. त्यासंबंधित काही प्रश्न खाली दिले आहेत. त्यांवर विचार करा. त्या प्रश्नांची उत्तरे तयार करून त्यांचे सलग लेखन करा.**

मी हे व्हायचे का ठरवले आहे ?

मी हे बनल्यानंतर भविष्यात काय काय करणार आहे ?

**मी.......... होणार!**

मी ठरवलेले होण्याबाबत माझ्या कुटुंबातील सदस्यांची काय मते आहेत ?

हे होण्यासाठी मी काय प्रयत्न करणार आहे ?

**(आ) खालील मुद्द्यांच्या आधारे अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा व त्याला योग्य शीर्षक द्या.**

संध्याकाळची वेळ .......... आईबरोबर फिरायला.......... झाडांवर बसलेले पाखरांचे थवे.......... किलबिल..........गाई-गुरे घराकडे .......... आल्हाददायक वातावरण..........आईशी गप्पा मारत घराकडे परतणे.

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**



शाब्बास ! चेंडूचा झेल छान घेतलास !



छे छे ! मला माहीत नाही !



बापरे ! तो पाहा साप !




अबब ! केवढी ही गर्दी !

आपल्या मनात दाटून आलेल्या भावना आपण एखाद्या उद्‍गारावाटे व्यक्त करतो. वरील वाक्यांतील शाब्बास, छे छे, बापरे, अबब ही **केवलप्रयोगी अव्यये** आहेत. या शब्दांमुळे आपल्या मनातील भावना प्रभावीपणे व्यक्त होतात. या शब्दांना उद्‍गारवाचक शब्द असेही म्हणतात.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना केवलप्रयोगी अव्ययांची विविध उदाहरणे देऊन अधिक सराव करून घ्यावा. विद्यार्थ्यांना शब्द, चित्र, चित्र व शब्द या वेगवेगळ्या स्वरूपांत अपूर्ण गोष्ट द्यावी व ती पूर्ण करून घ्यावी .

## ● आम्ही बातमी वाचतो.

### *मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा*



वानवडी, ता. २८ : विद्यावर्धिनी विद्यालय, वानवडी येथे जागतिक मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थ्यांनी कविता, गोष्टी, ओव्या सादर केल्या, तसेच ग्रंथप्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरात भित्तिपत्रके लावण्यात आली, त्यांतून विद्यार्थ्यांना मराठी भाषेच्या संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या वेळी मुलांनी कवी कुसुमाग्रज यांच्या निवडक कवितांचे वाचन केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विनया भांबुटे यांनी विद्यार्थ्यांसमोर मराठी भाषेचे महत्त्व विशद केले. इयत्ता सातवीतील कृष्णा साखरे या विद्यार्थ्याने सूत्रसंचालन केले, तर जयश्री रणदिवे या विद्यार्थिनीने उपस्थित सर्व मान्यवर व विद्यार्थी यांचे आभार मानले.

● **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) कार्यक्रमाची सुरुवात कशाने करण्यात आली?
(२) विद्यावर्धिनी विद्यालयात कोणकोणते कार्यक्रम साजरे करण्यात आले?
(३) मराठी राजभाषा दिन कोणत्या तारखेस साजरा केला जातो?
(४) कवी कुसुमाग्रज यांचे पूर्ण नाव काय?
(५) मराठी भाषेच्या संवर्धनासाठी काय करायला हवे, असे तुम्हांला वाटते?
(६) आंतरजालावरून कवी कुसुमाग्रज यांच्या कविता मिळवा व वाचा.

DHN9RT

### आपण समजून घेऊया.

● **खालील शब्द वाचा.**

पाऊल, गरीब, चूल, माणूस, जमीन, पाटील, कठीण, फूल, सामाईक, संगीत, शरीर.

वरील शब्दांतील शेवटच्या दोन अक्षरांचे निरीक्षण करा. काय जाणवते?

या शब्दांतील शेवटच्या अक्षराला काना, मात्रा, वेलांटी, उकार या चिन्हांपैकी कोणतेच चिन्ह नाही; म्हणजेच या शब्दांतील शेवटचे अक्षर अकारान्त आहे आणि शेवटून दुसऱ्या अक्षराला दिलेली वेलांटी किंवा उकार दीर्घ आहे.

**लक्षात ठेवा :** मराठी शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार दीर्घ लिहितात; परंतु तत्सम (संस्कृतमधून मराठीमध्ये जसेच्या तसे आलेले शब्द) शब्दांतील अकारान्तापूर्वीचे इकार व उकार संस्कृतमधील मूळ शब्दाप्रमाणे ऱ्हस्व लिहितात. उदा., चतुर, मंदिर, गुण, कुसुम, प्रिय, अनिल, स्थानिक.

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्यांचे श्रवण/वाचन करण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करण्यास सांगावे. उदा., क्रीडा.